# ग्रामस्थ दिन योजना

## उद्येश

भारतीय राज्य घटनेच्या ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीचे उद्येश, (केंद्रीय) माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रत्येक लोक (प्राधिकारी) (Public Authority) यांनी स्वयंस्फूर्तीने जनतेला द्यावयाची माहिती (Proactive Disclosure) शासकीय कामाकत विलंब टाळणेबाबत महाराष्ट्र शासनाने केलेला अधिनियम व त्यानुसार करावयाची नागरिकांची सनद आणि राष्ट्रीय ग्रामीण योजना अधिनियम २००५ मधील लोक लेखा परीक्षण (Social Audit) या व अशा शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या उत्तरदायित्वाच्या भूमिका स्पष्ट करणाऱ्या कायद्यातील तरतूदींचे प्रभावीपणे पालन व्हावे, तसेच ग्राम स्तरावरील अधिकारी / कर्मचारी, लोक प्रतिनिधी, ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था यांचेमध्ये चांगला समन्वय प्रस्थापित व्हावा व विविध शासकीय सेवांचे वितरण तसेच विविध कल्याण कारी योजनांचा फायदा खऱ्या लाभार्थीपर्यंत विनातक्रार मिळावा, त्याचा खुलेपणाने मासिक आढावा घेता यावा यासाठी ग्रामस्थ दिन हा उपक्रम सुरू करणेत येत आहे. केवळ तक्रार निवारण हा या उपक्रमाचा एकमेव हेतू नाही. ग्राम विकासाचे सर्वच प्रश्न ग्रामस्थांबरोबर चर्चा करून त्यांच्या सहभागाने हाताळणे व या प्रक्रियेमध्ये येणाऱ्याची अडचणींची सोडवणूक करणे अशी कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचे उद्येश खालील प्रमाणे आहेत :-

- गाव पातळीवर सकल प्रशासकीय यंत्रणेची उपलब्धता.
- सर्व शासकीय योजनांचा फायदा गावातील लोकापर्यंत कसा पोहोचेल हे बघणे
- शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांबाबत ग्रामस्थांमध्ये माहिती देवून जागृती निर्माण करणे.
- गाव पातळीवरील संस्था उदा. शाळा, रेशन दुकान, अंगणवाडी, आरोग्य केंद्र यांच्यावर सतत लक्ष ठेवून त्यांच्या कार्यात सुधारणा करणे.
- ग्रामस्तरावरील शासकीय सेवा प्रदान व इतर विकास कामांची तपासणी व ही कामे परिणामकारक व प्रभावीपणे होतील यासाठी प्रयत्न करणे.
- ग्रामस्थांच्या अडचणींचे त्वरीत निराकरण करणे

- ग्रामस्थांच्या सहमतीने गावाच्या विकासाची दिशा निश्चित करणे व ग्राम विकासाचे सूक्ष्म नियोजनाचे (**Micro Planning**) कामात ग्रामपंचायतीला सहाय्य करणे.
- प्रशासनाबद्यल लोकांचे मनात आपुलकी निर्माण करणे.
- प्रशासकीय व्यवस्थेतील सुधारणेबाबत लोकांचे मत अजमावणे.
- गाव कर्मचाऱ्यांच्या कामात पारदर्शकता आणणे.

ग्रामस्थ दिन योजनेत सर्व ग्रामस्थ व प्रशासकीय विभाग एकत्रित येवून ग्रामस्थांसमोर आपल्या कामकाजाचा आढावा देत असल्यामुळे, ग्रामस्थ दिनामार्फत खऱ्या अर्थाने सामाजिक परिक्षण (**Social Audit**) होत असते.त्याच बरोबर ग्राम स्तरावरील सर्व विभगाच्या कामकाजात पारदर्शकता येते व ग्राम स्तरावरील शासकीय कर्मचारी हे खऱ्या अर्थाने सर्व सामान्य जनतेस जबाबदार (**Accountable**) होतात. शासनाच्या विविध विभगाच्या अधिकाऱ्यात समन्वय व सुसत्रता सुध्दा याद्वारे आणली जावू शकते. सर्व सामान्य जनतेस शासनाच्या विविध योजनांची माहिती नसणे हा सध्याचा सर्वात मोठा प्रश्न आहे. ग्रामस्थ दिन हे एक असे व्यासपीठ आहे की, ज्यावरून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती शासनाचे अधिकारी / कर्मचारी सर्व सामान्य जनतेस देवू शकतात. ग्रामस्थ दिनाचे वरील परिस्थितीत कामकाज चालू असतांना सर्व सामान्य जनतेकडून शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या कामकाजाबद्यल काही तक्रारी येवू शकतात. या तक्रारींचे निराकरण करणे हा या ग्रामस्थ दिनाचा महत्वाचा भाग असला तरीही तो त्याचा एकमेव उद्येश नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

ग्रामस्थांचा अतिशय व्यापक स्वरूपात एक चळवळ म्हणून सहभाग आवश्यक असणाऱ्या शासनाच्या अनेक योजना आहेत. ग्रामस्थ दिनात या योजना सविस्तर पध्दतीने ग्रामस्थांना समजावून सांगता येतील व या योजनेत त्यांचे सहकार्य आणि सहयोग नोंदविला जावू शकतो. या माहिती पुस्तिकेत पुढे सप्तसुत्री कार्यक्रमांतर्गत लोकसहभाग आवश्यक असणाऱ्या काही योजना दर्शविल्या आहेत. तथापि ही यादी नमुना दाखल असून अशा सर्वच योजनांची चर्चा केली गेली पाहिजे.

वर नमूद केल्याप्रमाणे सदर योजना सुरूवातीस प्रायोगिक तत्वावर राबविण्यांत आली व य कालावधीत योजना राबविणारे अधिकारी / कर्मचारी, ग्रामपालक व प्रामुख्याने ज्याच्यासाठी ही योजना राबविण्यांत येत आहे ते ग्रामस्थ यांच्या विविध सूचना, प्रतिक्रिया, अभिप्राय जोणून घेण्यांत आल्या आहेत. काही ग्रामस्थांनी पत्रे पाठवून आपल्या वस्तुनिष्ठ प्रतिक्रिया कळविल्या. ग्रामपालक व पर्यवेक्षीय अधिकारी यांच्यासोबत चर्चा करण्यांत आली. या योजनांची बलस्थाने त्याच बरोबर सदर योजना राबवितांना येणाऱ्या अडचणी समोर आल्या. वृत्तपत्रातून या योजनेवर बोलक्या प्रतिक्रिया प्रसिध्द झाल्या. या सर्वांचा एकत्रित विचार केला असता, सदर योजना अत्यंत लोकोपयोगी असून, ती सर्व सामान्य जनतेच्या उपयोगाची ठरत असल्याचे चित्र दिसून आले. मात्र ती अधिक प्रभावी होण्याची गरज ठळकपणे जाणवली. सदर योजना अधिक लोकाभिमुख व अधिक उपयुक्त कशी होईल याच्या विचारमंथनातून सदर योजना काही फेरबदलासह संपूर्ण विभागात राबविण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे.

सदर ग्रामस्थ दिन यापुढे या विभागातील सर्व जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये घेण्यात येईल. मात्र प्रत्येक ग्रामपंचायतीत तो दरमहा घेण्याऐवजी तो या पुढे दर दोन महिन्यातून एकदा घेण्यांत येईल. दिनांक १ मे २००७ पासून ही योजना खालील सुधारणांसहित प्रत्यक्षात अंमलात आणण्यात यावी.

दिनांक १ मे २००७ पासून प्रत्येक ग्रामपंचायतीत दोन महिन्यातून एका बुधवारी ग्रामस्थ दिन घेण्याचे नियोजन जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संयुक्तपणे करावे. या कार्यक्रमाचे वेळापत्रक जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने निर्गमित व्हावे.